# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ९०/२०२३

**विषय— दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या आयोजित विषयांच्या परीक्षांचे फेरनियोजन करण्याबाबत...**

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार ऑक्टोबर, २०२२ परीक्षा दिनांक २७/१२/२०२२ पासून चालू झालेल्या आहेत. सर्व विद्याशाखांतर्गत सर्व अभ्यासक्रमांचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर वेळोवेळी जाहीर करण्यात आलेले आहे व त्यानुसार सर्व परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीतपणे चालू झालेल्या आहेत.

दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२३ रोजी आयोजित परीक्षा या तांत्रिक कारणामुळे फेरनियोजन करण्यात येईल असे आपणास पत्र क्र. पमूमं/२०२३/२१, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३ अन्वये कळविण्यात आलेले होते. त्यानुसार उपलब्ध वेळ व परीक्षा आयोजनाचा कालावधी यांचा विचार करिता सदर परीक्षांचे फेरनियोजन करण्यात येत आहे.

प्राप्त निर्देशानुसार आपणास कळविण्यात येते की, ऑक्टोबर, २०२२ परीक्षा मधील दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२३ रोजी आयोजित सर्व विषयांच्या परीक्षांचे फेरनियोजन रविवार दिनांक १२ फेब्रुवारी, २०२३ रोजी पूर्वीच्याच वेळापत्रकातील वेळेनुसार करण्यात येत आहे.

मा. प्राचार्य व महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकाचा आशय महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून विद्यापीठ परीक्षा आयोजनात सहकार्य करावे.

संदर्भ :— परीक्षा—समन्वय/२०७
दिनांक:— ०८ फेब्रुवारी, २०२३

8/2/2023

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,